# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०९/०५/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १० कि.मी अंतरावरील मौजा सिंगोरी गावाजवळ येथे दिनांक ०७/०५/२०२२ चे २३.३० वा. दरम्यान ट्रैक्टर मुंडा क्र. एम.एच–३५/जी–६१७५ व मळकट रंगाची ट्रॉली क्र. एम. एच–४०/एल–५८०५ तसेच ट्रैक्टर मुंडा क्र. एम.एच–४०/एल–५४७३ व ट्रॉली क्र. एमएच–४०/एल–५४७६ चा चालक आरोपी नामे– १) अजय गोपाल बर्डे वय ३२ वर्षे रा.साहोली ता. पारशिवनी व २) अमित ठोमेश्वर नागरकर वय २९ वर्षे रा. वार्ड क्र. ५ भानेगाव ता.सावनेर यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील एकुण दोन्ही ट्रैक्टरमध्ये दोन ब्रॉस रेती एकुण किंमती ६,०००/–रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. दोन्ही वाहनासह एकुण कि. ८,०६,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार रविंद्र बर्वे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात असले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पळनाटे पोलीस स्टेशन पारशिवनी मो.क्र. ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा पांडे ले–आउट वार्ड क्र. ०५ दहेगाव रंगारी येथे दिनांक ०७/०५/२०२२ चे १३.३० वा. ते १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रशांत मोहन तुरकेल, वय ४२ वर्ष, रा. पांडे ले–आउट, वार्ड क्र. ०५ दहेगाव रंगारी यांचे राहते घराचे मेन दाराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने आलमारी मध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागीने कि. ५५,०००/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री कॉक्रेटवार मो.क्र. ८३२९६६६६७८ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील वडोदा कामठी येथे दिनांक २३/०३/२०२२ चे १०.०० वा. ते दिनांक २७/०४/२०२२ चे १६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्री.प्रमीला प्रभाकर चामट वय ६५ वर्ष, रा. वडोदा ता. कामठी ही आपली मोहन माळ नेहमी किचन ओटयाच्या ड्रॉप मध्ये ठेवत होती. अक्षय त्रुतीया असल्याने फिर्यादी साफ सफाई करीत असतांना ड्रॉप उघडून पाहीले असता रुमालात बांधलेली मोहन माळ कि. ४०,०००/—रु. चा मुद्देमाल दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची २० ग्रॅम ची मोहन माळ कि. ४०,०००/—रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री. सतिश सोनकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**